● शनिवार, दि. ११ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १६४ वा ● किंमत २ रु. ● पाने ४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ MAHMAR/2013/50827

# जनआक्रोश मोर्चा




## संतोष देशमुख हत्या प्रकरण जलद न्यायालयात चालवा; हत्या करण्यास फाशीची शिक्षा द्या

### वाल्मिक कराड व प्रशांत महाजन यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करा; मराठा क्रांती मोर्चाची मागणी



जालना । प्रतिनिधी - बीड जिल्ह्यातील मस्साजजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची महिनाभरापुर्वी निर्घृण हत्या झाली होती. या हत्त्येचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रभर उमटायला सुरुवात झाली आहे. राज्यभरातून मोर्चे, आंदोलने निघाल्यानंतर जवळपास २४ दिवसांनंतर आरोपींना पकडण्यात पोलीसांना यश आले आहे. त्यातही काही मुख्य सुत्रधार व त्यांना मदत करणारे राजकीय मंडळी हे मोकाट असल्याचा आरोप विरोधकांसह मराठा क्रांती मोर्चाकडून होत आहे. जालना शहरात जनआक्रोश मोर्चा काढत संतोष देशमुख हत्या प्रकरण जलद न्यायालयात चालवून हत्या करणाऱ्यास फाशीची शिक्षा देण्याची मागणीसह वाल्मिक कराड व प्रशांत महाजन यांना सहआरोपी करुन त्यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात यावा. अशी मागणी करण्यात आली आहे.

शहरातील छत्रपती संभाजी महाराज पुतळा, मोतीबाग येथून मराठा क्रांती मोर्चाच्या जनआक्रोश मोर्चास सुरुवात झाली. तहसील कार्यालय, पोलीस अधिक्षक कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय ते अंबड चौफुली येथे जनआक्रोश मोर्चाचा समारोप करण्यात आला. प्रसंगी मोर्चात सरपंच संतोष देशमुख यांचे कुटुंबीय, मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्यासह विविध राजकीय पक्षातील नेते पदाधिकाऱ्यांसह मराठा समाजास इतर समाजातील बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मस्साजोग गावाचे मयत सरपंच संतोष देशमुख तसेच परभणी येथील सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना फाशी देण्याची मागणी मोर्चकरांनी केली. जोरदार घोषणांनी परिसर दणाणून गेला.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यां मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले असून या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी निर्घृण हत्या झाली. कै. संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना तात्काळ अटक करुन त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी., या प्रकरणात अटकेत असलेला वाल्मिक कराड याला सहआरोपी करुन खुनाचा गुन्हा दाखल करण्यात यावा., वाल्मिक कराड यांच्यावर वरदहस्त असणाऱ्या राजकीय मंडळींची एसआयटी चौकशी करावी., केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांना बडतर्फ करुन सहआरोपी म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा., कै. संतोष देशमुख हत्या प्रकरण जलद न्यायालयात चालविण्यात यावे., कै. संतोष देशमुख यांच्या कुटूंबियांना शासनाकडून एक कोटी रुपयांची मदत देण्यात यावी तसेच त्यांच्या मुलीस शासकीय नौकरीत सामावून घ्यावे., या प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत त्यांच्या गावास व कुटूंबियांस पोलीस संरक्षण देण्यात यावे., एसआयटी चौकशीसाठी नेमलेले अधिकारी हे बाहेरील विभागातील (झोन) असावे., स्व. सोमनाथ सुर्यवंशी यांची पोलीस कोठडीत पान २ वर



अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पीक स्पर्धा रब्बी हंगाम-२०२४

## २३२ शेतकऱ्यांनी घेतला सहभाग; शेतकऱ्यांना मिळणार पुरस्कार

**जालना । प्रतिनिधी -** राज्यामध्ये पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात व उत्पादकतेत वाढ करण्यात येते. अशा प्रयोगशील शेतकऱ्यांना मिळालेल्या उत्पादकतेबाबत प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती, मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होवून राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन राज्यांतर्गत पीक स्पर्धा योजना राबविण्यात येत आहे. जिल्ह्यामध्ये २३२ शेतकऱ्यांनी या पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेतला असून या मधून आता स्पर्धा विजेत्या शेतकऱ्यांना तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पुरस्कार दिले जाणार आहेत. अशी माहिती कृषी विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

वंचित, दुर्लक्षित तसेच पौष्टिक तृणधान्य पिकांच्या क्षेत्रात आणि उत्पादन तंत्रज्ञानात वाढ होण्याची आवश्यकता विचारात घेऊन तसेच जास्तीत जास्त शेतकरी पीक स्पर्धामध्ये सहभागी होतील या दृष्टीकोनातून खरीप व रब्बी हंगाम २०२४ पासून पीक स्पर्धा तालुका, जिल्हा व राज्य पातळीवर राबविण्यात येणार आहे. त्यानुसार कृषी विभागामार्फत रब्बी हंगाम सन- २०२४ मध्ये सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी गहू, ज्वारी, हरभरा, करडई व जवस या पिकांसाठी पीक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जिल्ह्यातील २३२ शेतकऱ्यांनी या पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेतला असून यामधून आता स्पर्धा विजेत्या शेतकऱ्यांना तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पुरस्कार दिले जाणार आहेत. रब्बी पान २ वर

## वाचन संस्कृतीच्या संवर्धनाने व्यक्तिमत्त्वाचा विकास - प्रो. डॉ. विजय पाटील




**जाफराबाद । प्रतिनिधी -** येथील सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय जाफराबाद येथे महाराष्ट्र शासन, वाड.मय मंडळ व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वाचन संकल्प महाराष्ट्राचा हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत वाचन कौशल्य व वाचन संवाद या विषयावर महाविद्यालयाचे मराठी विभागाचे प्रोफेसर डॉक्टर विजय पाटील हे बोलत होते. त्यांनी वाचन संस्कृती ही माहिती तंत्रज्ञानाच्या युगात कालबाह्य होत आहे. वाचन माणसाचं व्यक्तिमत्व फुलवतेच परंतु मनुष्य हा त्यांच्या निर्णय क्षमतेपर्यंत पोहोचतो म्हणून विद्यार्थ्यांनी वाचन संस्कृतीचे संवर्धन करणं आवश्यक आहे. वाचनाने माणसाचे मस्तक घडतं व घडलेले घडलेलं मस्तक हे कधीच कुणापुढे नतमस्तक होत नसतं म्हणून व्यक्तिमत्व विकासासाठी वाचन महत्त्वाचे आहे .याबरोबरच डॉ. विजय पाटील यांनी भाषिक कौशल्याच्या संदर्भात एक एक मुद्दा स्पष्ट करून वाचनाचे प्रकार विद्यार्थ्यांना समजावून सांगितले आणि विद्यार्थ्यांना पान २ वर

## वक्फ बोर्डाच्या त्या जमिनीवर उद्योग उभारण्यासाठी राजकीय नेत्यांचा खटाटोप सुरु

### आपण पूर्णतः गोरगरिबांच्या पाठीशी - आ. गोरंट्याल

जालना । प्रतिनिधी - शहरातील फुकटनगर भागातील वक्फ बोर्डांच्या जागेचा विषय सध्या चर्चेत असून वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काजी यांनी अतिक्रमण हटवण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे याभागातील नागरिकांमध्ये एकच तारांबळ उडाली आहे. वक्फ बोर्डाच्या या जमिनीवर उद्योग उभारण्याच्या खटाटोप काही राजकीय नेते करीत असल्याचा आरोप माजी आ. कैलास गोरंट्याल यांनी केला आहे. ते माध्यमांशी बोलत होते.



माजी आ. गोरंट्याल म्हणाले की, या संदर्भात आपण निवडणुकीपुर्वी येथील नागरिकांशी संवाद साधला होता. मात्र, येथील काह लोकं इकडे तिकडे जावून आश्वासन घेऊन आले होते. काही राजकीय नेत्यांचा या जागेवर डोळा आहे. या भुखंडावर उद्योग उभारण्यासाठी काही राजकीय नेते खटाटोप करत असून गोर गरीबांना हटविण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु आपण गोर गरिबांच्या पूर्णतः पाठीशी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. आपल्या शायरीच्या माध्यमातून त्यांनी भावना व्यक्त करत म्हटले अगर खिलाफ हैं, होने दो जान थोड़ी है, ये सब धुआं है कोई आसमान थोड़ी है, लगेगी आग तो आएंगे घर कई जद में, यहां पे सिर्फ हमारा मकान थोड़ी है.

# संपादकीय पान

## भारत मातेचे थोर सुपुत्र

भारतमातेचे थोर सुपुत्र देशाचे दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचा आज ५९ वा स्मृतिदिन आहे. लालबहादूर शास्त्री यांचे पूर्ण नाव लालबहादूर शारदाप्रसाद वर्मा असे होते. पण १९२५ साली बनारस येथील काशी विद्यापीठाची शास्त्री ही पदवी लालबहादूर यांनी मिळवली त्यामुळे त्यांना सर्वजण शास्त्री म्हणू लागले पुढे त्यांनी आपल्या नावापुढे शास्त्री हेच नाव लावले आणि ते लालबहादूर वर्माचे लालबहादूर शास्त्री बनले. त्यांचा जन्म २ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मोगल सराई या गावात झाला. लालबहादूर शास्त्री दीड वर्षाचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांच्या आईनेच त्यांचा सांभाळ केला. लालबहादूर शास्त्री यांचे बालपण गरिबीतच गेले. घरची हलाखीची परिस्थिती असूनही लालबहादूर यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. शालेय वयातच लाला लजपतरायांनी स्थापन केलेल्या द सर्व्हन्ट ऑफ द पीपल सोसायटीचे सदस्यत्व त्यांनी घेतले. महात्मा गांधींच्या विचाराने ते प्रभावित झाले होते. गांधीजींच्या असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला. गांधीजींसोबत दांडी यात्रेतही त्यांनी भाग घेतला होता. १९३९ साली त्यांची पंडित नेहरूंशी भेट झाली आणि ते स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले. देश स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुंच्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांनी रेल्वे व वाहतूक, दळणवळण, वाणिज्य व उद्योग आणि गृहमंत्रीपद भूषविले. ते रेल्वेमंत्री असताना एकदा रेल्वेचा अपघात झाला होता त्यात काही प्रवाशांना स्वतः चा जीव गमवावा लागला होता या अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारुन त्यांनी रेल्वे मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता. देश आणि संसदेने त्यांच्या या अभूतपूर्व निर्णयाची प्रशंसा केली होती. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनीही त्यांच्या या इनामदार वृत्ती आणि आदर्श मूल्यांची संसदेत प्रशंसा केली होती. पंडित नेहरुंच्या आकस्मिक निधनानंतर देशाची धुरा त्यांच्याकडे आली. ९ जानेवारी १९६४ रोजी देशाचे दुसरे पंतप्रधान म्हणून त्यांनी शपथ घेतली. शपथ घेतल्यानंतर अल्पावधीतच त्यांनी आपल्या कर्तुत्ववाने पंतप्रधानपदावर ठसा उमटविला. प्रखर राष्ट्रवादी असलेल्या शास्त्रीजींनी आपल्या पंतप्रधान कालावधीत देशहिताचे अनेक निर्णय घेतले. १९६५ साली पाकिस्तानने आगळीक करुन भारताशी युद्ध पुकारले. पण देशात लालबहादूर शास्त्री यांच्यासारखे खंबीर नेतृत्व असल्याने पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. आपल्या कणखर नेतृत्वाने त्यांनी पाकिस्तानला पराभूत केले. या युद्धानंतर त्यांच्या नेतृत्वाने जगातील मातब्बर नेते प्रभावित झाले. जय जवान, जय किसान या त्यांच्या मंत्राने देश भारावून गेला. लालबहादूर शास्त्री हे अवघे १९ महिने पंतप्रधान होते. या १९ महिन्यांच्या कालावधीत जनसामान्यांच्या हृदयात त्यांनी अढळ स्थान मिळवले. ११ जानेवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले. आज ५९ व्या स्मृतिदिनी शास्त्रीजींना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## गोवत्स राधाकृष्णजी महाराज यांच्या श्रीमद् भागवत कथेची जय्यत तयारी

# भोकरदन रोडवरील ब्रजधाममध्ये मंडप भूमिपूजन; पंधरा हजार भाविकांची बैठक व्यवस्था

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील नवा मोंढा रोडवर दानकुंवर परिसरातील श्री ब्रजधामध्ये १८ ते २४ जानेवारीदरम्यान गोवत्स प. पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या रसाळ वाणीतून आयोजित श्रीमद् भागवत कथा महोत्सवाचे मंडप भूमिपूजन व ध्वजारोहण बुधवार दि. ८ जानेवारी रोजी प. पू. मनोज महाराज गौड व वे. शा. सं. नागेश महाराज पाथरूडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत यजमान शिवरतन मुंदडा यांच्याहस्ते सपत्नीक करण्यात आले.

श्रीमद् भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाज यांच्या संयुक्त विद्यमाने ही कथा आयोजित करण्यात आली आहे. मंडप भूमिपूजनप्रसंगी भागवत कथा सेवा समितीचे पदाधिकारी आणि सदस्य, सर्व यजमान आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी आशीर्वाचनपर बोलताना पू. पू. मनोज महाराज गौड म्हणाले की, गोवत्स राधाकृष्णजी महाराज यांच्या कथेचे आयोजन म्हणजे प्रत्येकासाठी सौभाग्याचा क्षण आहे. श्रीमद्भागवत कथा ही फक्त धार्मिक सोहळा नसून, ती मानवजातीला शाश्वत शांती आणि सद्गुणांचा मार्ग दाखवणारी दिव्य प्रक्रिया आहे. भागवत कथा आपल्याला नित्यधर्म, मानवतेचे महत्त्व, आणि भगवंताशी जोडणारे तत्त्वज्ञान शिकवते. गोपूजन, तुलादान आणि भजनसंध्या यांसारखे कार्यक्रम या कथेच्या माध्यमातून समाजहिताचे दर्शन घडवतील, असे ते म्हणाले. जालना हे भाविक भक्तांचे शहर आहे. प्रत्येक धार्मिक कार्यक्रमात जालनेकर सदैव अग्रभागी असतात. भागवत कथा सनातन धर्माचे मूळ मजबूत करणारा ग्रंथ असल्याचे सांगून आपण सर्वजण एकत्र येऊन धर्म, भक्ती आणि सेवा यांचे महत्त्व अधोरेखित करूया, अशी साद त्यांनी घातली.

ब्रजधाम येथे १८ ते २४ जानेवारीदरम्यान दुपारी १ ते ५ या वेळेत श्रीमद् भागवत कथा होणार आहे. याशिवाय दररोज गोपूजन व तुलादान, पहाटे प. पू. राधाकृष्णजी महाराज यांच्या उपस्थितीत संभाजीनगर प्रभागातील श्री बालाजी मंदिर येथून विविध



भागात प्रभात फेरी, १९ जानेवारीला रात्री ८ वाजता वृंदावन धामचे पूज्य इंद्रेशजी महाराज यांचा भजन महोत्सव, २२ जानेवारीला रात्री ८ वाजता निकुंज कामरा आणि आरुषी गंभीर यांची भजन संध्या होणार आहे.

सहा वर्षानंतर जालना येथे प. पू. राधाकृष्णजी महाराज यांची कथा होत असून, पंधरा हजार भाविक बसू शकतील, अशी बैठक व्यवस्था करण्यात येत आहे. कथेच्या नियोजनासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले आहे. मोठ्या संख्येने भागवत कथा श्रवणाचा लाभ घेऊन आपल्या जीवनाला एक नवीन दिशा द्यावी, असे आवाहन श्रीमद् भागवत कथा सेवा समिती व सनातन हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

# १९ रोजी होणार मोफत महाआरोग्य शिबिर



पूनम ढिल्लन, धीरज कुमार, डॉ. धर्मेंद्र कुमार यांच्या उपस्थितीत डॉक्टर ३६५ बॉलीवूड महाआरोग्य शिबिराची पत्रकार परिषद १९ जानेवारी रोजी होणार मोफत आरोग्य शिबिर

डॉक्टर ३६५ चे अध्यक्ष डॉ. धर्मेंद्र कुमार आणि अभिनेता निर्माता दिग्दर्शक धीरज कुमार यांनी १९ जानेवारी २०२५ रोजी अंधेरी पश्चिम येथील चित्रकूट ग्राउंड येथे 'डॉक्टर ३६५ बॉलीवूड महा आरोग्य शिबिर' आयोजित केला आहे, ज्याचा हजारो लोकांना लाभ होणार आहे. मुंबईतील जुहू जिमखाना येथे बॉलीवूड महाआरोग्य शिबिर २०२५ च्या पत्रकार परिषदेत अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींनी आपली उपस्थिती नोंदवली, त्यात पूनम ढिल्लन, दीपक पाराशर, विंदू दारा सिंग, सद्गुरू श्री दयाल, संगीतकार दिलीप सेन, गायिका मधुश्री, ब्राइट आउटडोअर मीडियाचे डॉ. योगेश लखानी, दलजीत कौर, संगीता तिवारी, महेंद्र जी (चित्रकूट ग्राउंड), प्रशांत भाई, रोटरी क्लबचे चेतन. देसाई, मधुश्री, दिलीप सेन, हरीश चोक्सी, डॉ.कृष्ण कुमार, हरजित आनंद आदींची नावे उल्लेखनीय आहेत.

गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड धारक डॉ. धर्मेंद्र कुमार, अध्यक्ष, आरके एचआयव्ही एड्स संशोधन आणि काळजी केंद्र आणि निर्माता, दिग्दर्शक आणि अभिनेता धीरज कुमार, क्रिएटिव्ह आय लिमिटेड यांनी चित्रपट, टीव्ही आणि मीडियासाठी डॉक्टर ३६५ बॉलीवूड महा आरोग्य शिबिर आयोजित केले आहे.

डॉक्टर ३६५ चे डॉ धर्मेंद्र कुमार यांनी सांगितले की बॉलीवूड महाआरोग्य शिबिराचे हे चौथे वर्ष आहे. २०२२ पासून हे विशेष शिबिर सुरू करण्यात आले. माझे मोठे भाऊ धीरज कुमार जी माझ्यासोबत पायरीवर काम करत आहेत. टीव्ही आणि सिने जगताशी ते ५० वर्षांपासून जोडले गेले आहेत. दंगल टीव्हीचे व्यवस्थापकीय संचालक मनीष सिंघल आणि रमेश तौरानी यांचाही मोठा पाठिंबा आहे. यावर्षी आम्ही ४ कोटींहून अधिक किमतीची औषधे शिबिरासाठी आणत आहोत. प्रत्येक रोगाचे अनेक डॉक्टर्स येथे उपस्थित राहणार आहेत. यावेळी महिलांसाठीही अनेक विशेष सुविधा देण्यात आल्या आहेत. या शिबिरात मोफत आरोग्य तपासणी, मोफत औषधे, मोफत नेत्र तपासणी, चष्मे व व्हीलचेअरचे वाटप करण्यात येणार आहे. डॉक्टर ३६५ ने ५ कोटी ५६ लाख रुग्णांना पाहून आणि १ कोटी ९० लाख लोकांना मोफत क्षयरोग तपासणी करून अनेक विक्रम केले आहेत. पुढील वर्षी आम्ही टीबीमुक्त गुजरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे सोपवणार आहोत.

धीरज कुमार म्हणाले की, धर्मेंद्र कुमार जी एकटेच फिरले होते आणि मग लोक एकत्र येत राहिले आणि एक कारवां तयार झाला. आज अनेक लोक या महाआरोग्य शिबिर आणि धर्मेंद्र जी मध्ये सामील झाले आहेत. चित्रपटसृष्टीतील लोकांसाठी हे एक ऐतिहासिक पाऊल आहे आणि आम्ही सर्व त्यांच्या पाठीशी उभे आहोत. तुम्ही सर्व १९ जानेवारीला इथे या आणि त्याचा लाभ घ्या.

पूनम ढिल्लन, धीरज कुमार, डॉ. धर्मेंद्र कुमार यांच्या उपस्थितीत डॉक्टर ३६५ बॉलीवूड महाआरोग्य शिबिराची पत्रकार परिषद १९ जानेवारी रोजी होणार मोफत आरोग्य शिबिर

डॉक्टर ३६५ चे अध्यक्ष डॉ. धर्मेंद्र कुमार आणि अभिनेता निर्माता दिग्दर्शक धीरज कुमार यांनी १९ जानेवारी २०२५ रोजी अंधेरी पश्चिम येथील चित्रकूट ग्राउंड येथे 'डॉक्टर ३६५ बॉलीवूड महा आरोग्य शिबिर' आयोजित केला आहे, ज्याचा हजारो लोकांना लाभ होणार आहे. मुंबईतील जुहू जिमखाना येथे बॉलीवूड महाआरोग्य शिबिर २०२५ च्या पत्रकार परिषदेत अनेक बॉलिवूड सेलिब्रिटींनी आपली उपस्थिती नोंदवली, त्यात पूनम ढिल्लन, दीपक पाराशर, विंदू दारा सिंग, सद्गुरू श्री दयाल, संगीतकार दिलीप सेन, गायिका मधुश्री, ब्राइट आउटडोअर मीडियाचे डॉ. योगेश लखानी, दलजीत कौर, संगीता तिवारी, महेंद्र जी (चित्रकूट ग्राउंड), प्रशांत भाई, रोटरी क्लबचे चेतन. देसाई, मधुश्री, दिलीप सेन, हरीश चोक्सी, डॉ.कृष्ण कुमार, हरजित आनंद आदींची नावे उल्लेखनीय आहेत.

गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड धारक डॉ. धर्मेंद्र कुमार, अध्यक्ष, आरके एचआयव्ही एड्स संशोधन आणि काळजी केंद्र आणि निर्माता, दिग्दर्शक आणि अभिनेता धीरज कुमार, क्रिएटिव्ह आय लिमिटेड यांनी चित्रपट, टीव्ही आणि मीडियासाठी डॉक्टर ३६५ बॉलीवूड महा आरोग्य शिबिर आयोजित केले आहे.

डॉक्टर ३६५ चे डॉ धर्मेंद्र कुमार यांनी सांगितले की बॉलीवूड महाआरोग्य शिबिराचे हे चौथे वर्ष आहे. २०२२ पासून हे विशेष शिबिर सुरू करण्यात आले. माझे मोठे भाऊ धीरज कुमार जी माझ्यासोबत पायरीवर काम करत आहेत. टीव्ही आणि सिने जगताशी ते ५० वर्षांपासून जोडले गेले आहेत. दंगल टीव्हीचे व्यवस्थापकीय संचालक मनीष सिंघल आणि रमेश तौरानी यांचाही मोठा पाठिंबा आहे. यावर्षी आम्ही ४ कोटींहून अधिक किमतीची औषधे शिबिरासाठी आणत आहोत. प्रत्येक रोगाचे अनेक डॉक्टर्स येथे उपस्थित राहणार आहेत. यावेळी महिलांसाठीही अनेक विशेष सुविधा देण्यात आल्या आहेत. या शिबिरात मोफत आरोग्य तपासणी, मोफत औषधे, मोफत नेत्र तपासणी, चष्मे व व्हीलचेअरचे वाटप करण्यात येणार आहे. डॉक्टर ३६५ ने ५ कोटी ५६ लाख रुग्णांना पाहून आणि १ कोटी ९० लाख लोकांना मोफत क्षयरोग तपासणी करून अनेक विक्रम केले आहेत. पुढील वर्षी आम्ही टीबीमुक्त गुजरात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे सोपवणार आहोत.

धीरज कुमार म्हणाले की, धर्मेंद्र कुमार जी एकटेच फिरले होते आणि मग लोक एकत्र येत राहिले आणि एक कारवां तयार झाला. आज अनेक लोक या महाआरोग्य शिबिर आणि धर्मेंद्र जी मध्ये सामील झाले आहेत. चित्रपटसृष्टीतील लोकांसाठी हे एक ऐतिहासिक पाऊल आहे आणि आम्ही सर्व त्यांच्या पाठीशी उभे आहोत. तुम्ही सर्व १९ जानेवारीला इथे या आणि त्याचा लाभ घ्या.

## आर्यारवी एंटरटेनमेंट तर्फे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट सोहळ्याचे आयोजन !

**मुंबई । प्रतिनिधी -** आर्यारवी एंटरटेनमेंट प्रस्तुत पहिल्या आणि दुसऱ्या राष्ट्रीय लघुपट महोत्सवाच्या अभूतपूर्व यशानंतर आर्यारवी एंटरटेनमेंट तर्फे आता तिसऱ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय लघुपट सोहळ्यांचे आयोजन करण्यात आलेले आहे. या लघुपट सोहळ्यामध्ये भारतातील आणि भारताबाहेरील कुठल्याही भाषेचे लघुपट पाठवू शकतात. फक्त मराठी व हिन्दी लघुपट वगळता इतर भाषिक लघुपटांना इंग्रजी सबटायटल्स असणे बंधनकारक असणार आहे. लघुपटासाठीचा कालावधी जास्तीत जास्त १ ते ३० मिनिटांचा असावा. या लघुपट सोहळ्यामध्ये सहभाग घेण्याची अंतिम तारीख ३१ जानेवारी, २०२५ असून यांत सर्वोत्कृष्ट तीन लघुपटांना रोख पारितोषिके व आकर्षक सन्मानचिन्ह देऊन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. शिवाय इतरही वैयक्तिक रोख पारितोषिके आणि सन्मान प्रदान केले जाणार असून सहभागी सर्वच लघुपटांना प्रशस्तिपत्रक दिले जाणार आहे. लघुपट निर्मात्यांनी २०१८ ते २०२४ ह्या कालावधी अंतर्गत चित्रित झालेले लघुपट पाठवावेत. लघुपट सोहळ्याची तारीख लवकरच जाहीर करण्यात येईल. अधिक माहितीकरता आर्यारवी एंटरटेनमेंटचे आयोजक महेश्वर तेटांबे (संपर्क - ९०८२२९३८६७), मनिष व्हटकर (संपर्क - ९९६९९२०८२८), सौ.लक्ष्मी गुप्ता (संपर्क - ८०८२०९६३६३) आणि आनंद खाडे (संपर्क - ८८७९५८७५०३) यांच्याकडे संपर्क साधावा.

## पान १ वरुन

### संतोष देशमुख ...

झालेल्या मारहाणीत मृत्यू झाला. त्यांना मारहाण करणारे सर्व अधिकारी-कर्मचारी यांना बडतर्फ करावे. त्यांच्या कुटूंबियांतील सदस्यांना शासकीय नौकरीत सामावून घ्यावे. या मागण्यांचा समावेश असून मागण्यांचा गांभीर्याने तात्काळ विचार करुन मागण्या मान्य कराव्यात अन्यथा मराठा क्रांती मोर्चाच्यावतने तीव्र आंदोलनाचा ईशाराही देण्यात आला आहे.

### २३२ शेतकऱ्यांनी ...

हंगाम सन २०२४-२५ पीक स्पर्धेमध्ये जिल्ह्यात एकुण २३२ शेतकऱ्यांनी पीक स्पर्धेमध्ये भाग घेऊन सहभाग नोंदविला आहे. तालुकानिहाय सहभागी स्पर्धक संख्या पुढीलप्रमाणे जालना-२०, बदनापूर-३०, भोकरदन-३९, जाफ्राबाद-३०, परतूर-२०, मंठा-२९, अंबड-२९, घनसावंगी-३५ अशी एकुण २३२ आहे. असे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### वाचन संस्कृतीच्या ...

उपक्रमात मोठ्या प्रमाणे सहभागी व्हावे असे आवाहन केले

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एस एल मेढे हे होते . त्यानी अध्यक्षीय समारोपात विद्यार्थ्यांनी वाचनात सहभागी होणं अतिशय महत्त्वाचे आहे. जे जे व्यक्ती आज फार मोठ्या पदावर पोहोचलेल्या आहेत त्या व्यक्तींनी या अगोदर वाचन केलं. वाचनानेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला आणि ते आज एका वेगळ्या शिखरावर गेलेले आहेत. म्हणून विद्यार्थ्यांनी या वाचन संस्कृतीचा विकास करावा असे म्हटले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागाचे प्रा. डॉ. एस पी जगतवाड यांनी केले तर आभार महाविद्यालयातील ग्रंथालय विभागाचे ग्रंथपाल प्रा.अशोक पठाडे यांनी केले या कार्यक्रमाप्रसंगी ग्रंथालयातील कर्मचारी धनंजय भिसे , गफार खान दिलीप घुगे कृष्णा ठोसर यांनी विशेष परिश्रम घेतले कार्यक्रमाची सांगता झाली राष्ट्रगीताने झाली.

## भिमजयंती चित्रपटाची घोषणा



**अंधेरी -** नुकतेच अंधेरी पश्चिम स्थित हॉटेल ९७ मध्ये भीम जयंती या मराठी चित्रपटाची घोषणा करण्यात आली आहे .यावेळी चित्रपट निर्माते उमेश म्हैसकर , दिग्दर्शक विलास गाडगे सह - निर्माते उज्वला भांडेकर , यशवंत भांडेकर , संतोष मेन्धेकर , वर्षा आणि मुकुल पगारे उपस्थित होते.

भीमजयंती चित्रपटाविषयी माहिती देताना निर्माते उमेश म्हैसकर यांनी सांगितले की हां चित्रपट ीळपतीन महिन्यात पूर्ण करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती च्या सुमारास प्रदर्शित करण्यात येईल. हां चित्रपट सामाजिक जागरुकता चा संदेश देईल. या चित्रपटात एकूण पाच गाणी असून ती गायक स्वप्नील बांदोडकर , आदर्श शिंदे , बेला शेंडे आणि संतोषी यांनी गायली असून संगीतकार आहेत बाबा जागिरदार तर डीओपी आहेत युवराज केदवतकर चित्रपटात नवोदित नायक नायिका असून लवकरच त्यांची नांवे जाहीर करण्यात येतील.

चित्रपटाचे शूटिंग वर्धा ,नागपूर आणि मुंबई येथे करण्यात येईल.

## नव उद्योजकांसाठी नि:शुल्क प्रशिक्षण शिबीर

**डोंबिवली । प्रतिनिधी -** डोंबिवलीतील ब्राह्मणसभा आणि ध्रुव अॅकॅडमी,यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक१२जानेवारी२०२५रोजी सकाळी८.३०ते२.३०या वेळेत ब्राह्मणसभा डोंबिवली पुर्व येथे'उद्यमेन ही सिद्ध्यन्ति'या ब्राम्हण उद्योजकांसाठी निःशुल्क मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.उद्योजकीय मानसिकता,उद्योजकाला आवश्यक असणारे सॉफ्ट स्किल्स याबरोबरच भांडवल उभारणी,मार्केटिंग आणि नेटवर्किंग आणि सरकारी योजनांचा लाभ या मुद्यांवर सदर शिबिरात तज्ञांचे मार्गदर्शन मिळेल.डॉ.उल्हास कोल्हटकर सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान भूषविणार आहेत.डोंबिवलीकर समूह आणि मीडीया पार्टनर डोंबिवली ब्राम्हण उद्योजक समूह यांच्या सहकार्याने हे शिबीर संपन्न होईल. सदर शिबिरासाठी नोंदणी करावयाची असल्यास इच्छूकांनी विनोद देशपांडे, ध्रुव अॅकॅडमी:९८१९ ७७३ ९७०या क्रमांकावर संपर्क साधावा.

# पत्रकारितेतून समाजाचा विकास झाला पाहिजे

## शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे; दर्पण दिनानिमित्त पत्रकार बांधवांचा सत्कार सोहळा संपन्न



**बदनापूर । प्रतिनिधी** - पत्रकारांनी आपल्या पत्रकारितेतून समाजाचा विकास झाला पाहिजे असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी शिवसेना तालुका कार्यालय बदनापूर येथे दर्पण दिनानिमित्त आयोजित पत्रकार सत्कार सोहळ्यात मांडले. सहा जानेवारी रोजी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण नावाचे पहिले मराठी भाषेतील वृत्तपत्र सुरू केले होते म्हणून महाराष्ट्रात ६ जानेवारी हा पत्रकार दिन दर्पण दिन म्हणून साजरा केला जातो त्यानिमित्त बदनापूर तालुका शिवसेनेच्या वतीने मान्यवराच्या हस्ते उपस्थित पत्रकार बांधवांचा सन्मान करण्यात आला . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी बदनापूर विधानसभा संघटक कैलास दुधानी तर प्रमुख पाहुणे म्हणून अमोल दाभाडे शिवसेना शहरप्रमुख, मराठी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष आनंद इंदाणी, डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेचे जालना जिल्हाध्यक्ष किशोर सिरसाठ तसेच आक्रम भाई व रफिक भाई,हे मंचावर उपस्थित होते.

ते पुढे बोलताना आपल्या पत्रकारितेतून पत्रकारांनी वंचित समाजाला जागृत करून आपल्या लेखणी या शस्त्राचा वापर सकारात्मक ध्येय ठेवून पत्रकारीतेत आधुनिक बदल स्वीकारावेत असे आवाहन करून पत्रकार बांधवांना दर्पण दिनानिमित्त शुभेच्छा.. दिल्या.मराठी पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष आनंद इंदाणी यांनी बदनापूर तालुक्यातील पत्रकार भवन साठी जागा उपलब्ध करून पत्रकार यांना एक नवीन व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात यावे असे आवाहन करण्यात आले.यावे ज्येष्ठ पत्रकार संतोष सारडा,संजय भुजाळ, रफिक भाई, आक्रम भाई , गजानन घनघाव ,नारायण ब्राह्मणे,नजागत सर,अमृत तारो सर, कैलास वैद्य,भागवत पवार,दाड सर,आदिल भाई, आदिंसह उपस्थित पत्रकार बांधवांचा शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या वतीने सन्मान देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमोल दाभाडे यांनी केले, सुत्रसंचलन कैलास वैद्य यांनी केले तर आभार देवा ढाकणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश चोरमारे, दिपक दिघे,सुरेश घोरपडे, किशोर घोरपडे, योगेश वीर, गजानन दिघे,संजय सपकाळ, आदी सह शिवसेना पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले

# परतुर तालुक्यातील आठ हजार घरकुलांना उद्दिष्ट प्राप्त

## आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नांना यश

**परतूर । प्रतिनिधी -** माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी निवडणुकीपूर्वी परतुर तालुक्यातील सर्वसामान्य गोरगरीब जनतेला दिलेला शब्द पाळला असून प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत ८००० घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून सर्व ग्राम पंचायतीनी प्राधान्य क्रमानुसार गावातील लाभार्थ्यांची रजिस्ट्रेशन येत्या २४ तासाच्या आत करून घ्यावें असे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले आहे



आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात पुढे म्हटले आहे की, रजिस्ट्रेशन प्रक्रियेनंतर तात्काळ लाभार्थ्यांच्या विहित नमुन्यातील फाईल ग्रामपंचायत मार्फत पंचायत समिती परतूरला सादर कराव्यात असेही या पत्रकात नमूद करण्यात आले आहे

आमदार बबनराव लोणीकर यांनी निवडणूक काळामध्ये मोठ्या प्रमाणात घरकुले मतदारसंघात खेचून आणणार असल्याचे सांगितले होते या पार्श्वभूमीवर लोणीकर यांनी निवडणूक संपताच घरकुलांसाठी उद्दिष्ट प्राप्त केल्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये आनंदाचे वातावरण आहे

केंद्र व राज्य सरकार हे खऱ्या अर्थाने गोरगरिबांसाठी काम करणारे सरकार असून, सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय राज्य व केंद्र सरकारने घेतलेली असून यापुढेही सर्वसामान्य जनतेला केंद्रबिंदू मानून राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून मतदार संघाचा विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी या पत्रकात नमूद केले आहे.

# राष्ट्रीय युवा दिनानिमित्त विविध स्पर्धेचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून दि. १२ ते १९ जानेवारी २०२५ या कालावधीत विविध शाळा व महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने युवा दिन युवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. युवा सप्ताहात गायन स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, स्वच्छता मोहिम, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विविध खेळांच्या स्पर्धा घेण्यात येणार असून शाळा, महाविद्यालय, संस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन क्रीडा विभागाकडून करण्यात आले आहे.



केंद्र शासनाच्या योजनेद्वारे संपूर्ण भारतामध्ये स्वामी विवेकानंद यांचा जन्म.दिवस १२ जानेवारी हा युवा दिन म्हणून साजरा केला जातो. तसेच १२ ते १९ जानेवारी हा कालावधी युवा सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. देशाची सर्वांत मोठी शक्ती ही युवा शक्ती असून युवकांमध्ये असलेल्या सुप्त.गुणांना विकसित करण्यासाठी व १५ ते ३५ वयोगटातील युवकांसाठी एक संदेश या माध्यमातून देण्याचा प्रयत्न या सप्ताहाद्वारे करण्यात येतो. अधिक माहितीसाठी युवा सप्ताह कार्यक्रम प्रमुख रेखा परदेशी मो.९०२२९५१९२४ यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# ॲड. निलेश हेलोंडे पाटील जालना दौऱ्यावर



**जालना -** कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ड. निलेश हेलोंडे पाटील यांचा जालना जिल्हाच्या दौऱ्यावर येत असून त्यांचा दौऱ्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

मंगळवार दि.१४ जानेवारी २०२५ रोजी अमरावती येथून शासकीय विश्रामगृह जालना येथे दुपारी ३ वाजता आगमन व राखीव. दुपारी ३.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात आगमन व राखीव. दुपारी ५.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय येथून परभणीकडे प्रयाण करतील.

# केंद्रस्तरीय कब बुलबुल मेळावा उत्साहात

टेंभुर्णी । प्रतिनिधी - येथून जवळच असलेला सावरगाव म्हस्के ता. जाफराबाद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत केंद्रस्तरीय स्काऊट गाईड कब बुलबुल उत्सव आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रप्रमुख सुधाकर चिंधोटे हे होते तर यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आत्माराम म्हस्के, जिल्हा परिषद शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन विनोद कळंबे,संचालक दिपक चव्हाण,स्काऊट गाईड केंद्र समन्वयक मुकेश ठाकूर, निरीक्षक गजानन घुगे,नारायण पिंपळे, एम.के. वायाळ,डी. आर. मुनेमाणिक, एन. डी .देशमुख,भगवान शेळके, मधुकर गोफणे, सुखदेव काकडे,गजानन मुंढे,भाऊसाहेब जाधव,सोपान शिंदे,उमेश सौदर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले .यावेळी आयोजित बटाटा शर्यत, पोता शर्यत, दोरी वरील उड्या, तीन टांगी शर्यत यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना यावेळी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले सावरगाव शाळेच्या वतीने उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना पुलाव व खिर वाटप करण्यात आली. यावेळी सिद्धेश्वर लंगोटे, काकासाहेब बनकर, कैलास जाधव, अर्जुन राऊत, सुनीता देशपांडे, लता चापाईतकर, अंकिता धारगावे, प्रताप खेडेकर, नितीन आढावे, मनीषा वायाळ यांच्यासह केंद्रातील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



युवा आदर्श

**बोलता ...**

काय बोलणार नेता
लोक पाहतात वाट
नेम नाही कसलाही
कुणाची लावी वाट
भाषणासाठी तयारी
कसा राजेशाही थाट
स्तुती कराया त्यांची
उत्सुक आधीचं भाट
गर्दी नुसती उसळली
किती केवढी अफाट
विधाने करी अचाट
वक्ता बोलतो बेफाट
सोडत नाही कुणाला
टिकास्त्र सोडे सुसाट
बिना कर करमणूक
लोक नाचती पिसाट
खळखळ सारी थांबे
उसळून कोसळे लाट
आवाज विरून जाई
खडकांवर फुटाफाट
ताकद अशी शब्दांची
जनता बनली सैराट
निवडणूक यश नाही
पराकम जरी विराट

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी मराठवाडा शिक्षक संघाचे विभागीय शिक्षण मंडळासमोर जोरदार निदर्शने

**टेंभुर्णी** - शिक्षक -शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यासाठी मराठवाडा शिक्षक संघाच्या वतीने बुधवार दिनांक ०८ जानेवारी रोजी दुपारी विभागीय शिक्षण मंडळाच्या कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली मराठवाडा शिक्षक संघाचे अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम व जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली लक्षवेधी धरणे आंदोलन संपन्न झाले. मराठवाडा शिक्षक संघ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या संदर्भात सातत्याने आंदोलन करीत आहे आज बुधवारी पुन्हा संघटनेने आंदोलनाचे हत्यार उपासले. केंद्रप्रमुख, पर्यवेक्षक, लिपिक, शिपाई, परीक्षक, मॉडरेटर, चीफ मॉडरेटर यांचे मानधन वाढविण्यात यावे. ५६ वर्ष पूर्ण करणाऱ्या शिक्षकांना परीक्षा कामातून सूट द्यावी. स्वयं अर्थासहित शाळेतील शिक्षकांना सुद्धा पेपर तपासणी कामावर घ्यावे. एका शिक्षकास एकाच विषयाच्या प्रश्न उत्तर पत्रिका तपासणीसाठी द्याव्यात. कर्मचाऱ्यांचे परीक्षा सबंधातील मानधन तात्काळ देण्यात यावे आदी मागण्यासाठी हे धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी शिक्षकांनी जोरदार घोषणाबाजी करून आपल्या मागण्याकडे लक्ष वेधून घेतले. आंदोलनानंतर एका शिष्टमंडळाने विभागीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अनिल साबळे यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन दिले. या आंदोलनामध्ये मराठवाडा शिक्षक संघाचे केंद्रीय अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव केंद्रीय सचिव राजकुमार कदम व उपाध्यक्ष ज्ञानोबा वरवट्टे, जिल्हा सचिव भाई चंद्रकांत चव्हाण, प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने, प्रा. डॉ. उमाकांत राठोड, रमेश आंधळे, व्यंकटराव चिलवरवार, कालिदास धपाटे, गणेश आजबे, संजय येळवंते, सय्यद फरकुंद अली, दीपक शेरे, भगवान पालकर, भागवत काकडे, डी.जी.तांदळे, अजय कदम, एन.टी.सोळंके, बी.ए. वऱ्हाड, एच.के.भडके, आर. एम. डोल्हारे, विनोद सवासे,पुरुषोत्तम येडे, प्रभाकर उंबरे, आर. आर. जाधव, प्रल्हाद शिंदे, मोहन शेळके, अशोक ढमढेरे, सविता इंगळे, शितल कवडे, अरुणा चौधरी, संतोष सुरडकर, पद्माकर पगार, गणेश राठोड, दीपक वाघ, बाळू पवार, विलास चंदने, विनोद केणेकर, विलास चव्हाण, नवनाथ मंत्री, आर.आय. शेख, के. एस. गोरे, एस. सी. चव्हाण यांच्यासह मोठ्या संख्येने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.





# पहिल्यांदाच फातेमा शेख यांच्या जयंतीनिमित्त महिला शिक्षक दिन साजरा




**टेंभुर्णी । प्रतिनिधी** - ९ जानेवारी हा दिवस भारताच्या पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका, फातेमा शेख यांचा जन्मदिवस, आणि याचेच औचित्य साधुन ई बी के उर्दू विद्यालय टेंभुर्णी येथे मुस्लिम महिला शिक्षक दिन साजरा करण्यात आला, ज्यामध्ये मुलींना एक दिवसासाठी शिक्षकाचे कर्तव्य बजावण्याची संधी देण्यात आली. जी शाळेतील विद्यार्थिनींनी आनंद व उत्साहात बजावली. अशा ह्या आगळ्या वेगळ्या उर्दू महिला शिक्षक दिनाची सर्वत्र चर्चा आहे.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# नवोदय प्रवेश परीक्षा कॉपीमुक्त व पारदर्शकपणे घेण्यात यावी

## रुद्राणी फाऊंडेशनची मागणी, शालेय शिक्षणमंत्री यांना दिले निवेदन

**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी =** शालेय शिक्षणमंत्री मा ना श्री दादासाहेब भुसे यांची रुद्राणी फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट घेतली. जालना जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात येणाऱ्या १८ जानेवारी २०२५ रोजी होऊ घातलेल्या नवोदय प्रवेश परीक्षा या ग्रामीण भागातील होतकरु, गरीब व अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असून विद्यार्थ्यांच्या भविष्यास आकार देणारी आहे. हि परिक्षा कॉपीमुक्त आणि भयमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी शिक्षण विभागास आदेशीत करावे अशी मागणी केली.

सदरील नवोदय प्रवेश परीक्षा चझडउ, णझडउ धर्तीवर घेण्यात यावी. शालेय शिक्षक वगळून इतर विभागांच्या अधिकार्यांची परिक्षा पर्यवेक्षक म्हणून नेमणूक करावी. शिक्षकांच्या नेमणुका केल्यास जिल्ह्याअंतर्गत शिक्षकांच्या नेमणुका करण्यात येऊ नये. परिक्षा दरम्यान पर्यवेक्षकांना मोबाईल वापराची बंदी घालण्यात यावी. परीक्षेदरम्यान योग्य पोलिस बंदोबस्त देण्यात यावा. सदरील परिक्षा उउढत च्या निगराणी खाली घ्यावी व उउढत चा डेटा सेव्ह करून ठेवण्यात यावा जेणेकरून पालकांच्या तक्रारीनंतर त्या त्या परिक्षा केंद्रावरील उउढत फुटेज तपासुन दोषी अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यावर कडक कार्यवाही करावी. परिक्षेसाठी समावेक्षक म्हणून वर्ग २ च्या अधिकार्यांची नेमणुक करण्यात यावी. जेणेकरून वर्षभर प्रामाणिकपणे मेहनत आणि अभ्यास करणाऱ्या गरीब होतकरु विद्यार्थ्यावर अन्याय होणार नाही व खऱ्या गरजवंतांनाच परिक्षेच्या माध्यमातून नवोदय विद्यालयात प्रवेश मिळेल. अशा स्वरूपाचे निवेदन रुद्राणी फाऊंडेशनच्या वतीने शालेय शिक्षणमंत्री मा ना श्री दादासाहेब भुसे यांना दिले या निवेदनावर रुद्राणी फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष मा श्री भीमाशंकर आप्पा दारुवाले, उपाध्यक्ष पांडुरंग पा इंगळे, सचिव कैलास आप्पा गबाळे यांचेसह भगवान पा पुंगळे, आत्मलिंग कोमटे, रवी पुंगळे,नामदेव रजाळे साहेबराव पवार, ज्ञानेश्वर बोर्डे, पद्माकर चंदनशिवे, गजानन सानप इ स्वाक्षऱ्या आहेत

गोरगरीब खऱ्या गरजवंत गुणवंत विद्यार्थ्यांना न्याय मिळेल- भीमाशंकर दारुवाले

कॉपीमुक्त व पारदर्शकपणे परिक्षा घेतल्यास अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना नवोदय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होऊन विद्यालयात प्रवेश मिळुन अनेक क्षेत्रांत भविष्यातील दर्जेदार अधिकारी घडतील व भारतीय समाजाला चांगले आणि प्रामाणिक अधिकारी मिळतील यासाठी आम्ही हा प्रयत्न करत आहोत

## शंभर शिक्षक क्लब ऑफ जालनातर्फे प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांचा सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** शैक्षणिक, सामाजिक, आणि सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांचा शंभर शिक्षक क्लब ऑफ जालनाच्यावतीने गौरव करण्यात आला.

शैक्षणिक क्षेत्रातील नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्या शिक्षकांचा आणि शाळांचा दरवर्षी क्लबच्यावतीने सन्मान केला जातो. यावर्षीही क्लबतर्फे महाराष्ट्रातील अनेक शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांच्या विद्यार्थ्यांप्रती असणाऱ्या तळमळीने व राबवलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांमुळे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर माध्यमिक शिक्षणाधिकारी श्रीमती मंगला धुपे, जालना मनपा आयुक्त संतोष खांडेकर, उपशिक्षणाधिकारी श्याम देशमुख, गटशिक्षणाधिकारी रवी जोशी, सुप्रसिद्ध बालसाहित्यिक डॉ. विशाल तायडे, डॉ. ज्योती धमधिकारी, सुभाष भालेराव, डॉ. वानखेडे, डॉ. बळीराम बागल, डॉ. पद्माकर सबनीस, डॉ. प्रदीप हुसे, इंजिनिअर एस.एन. कुलकर्णी, एम.जी. जोशी तसेच १०० शिक्षक क्लबचे अध्यक्ष राजेभाऊ मगर, निवड समितीचे अध्यक्ष आर.आर. जोशी, संदीप इंगोले आणि मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख पाहुणे आर. आर. जोशी यांनी चिंचखेडकर कार्याचा विशेष उल्लेख केला. प्रा. श्रीकांत चिंचखेडकर यांनी क्लबच्या उपक्रमांचे कौतुक करताना सांगितले की, शंभर शिक्षक क्लब ऑफ जालनाकडून शिक्षकांकडून कुठलाही अर्ज न मागवता चाणाक्षपणे माहिती गोळा करून आदर्श शिक्षकांचा सन्मान केला जातो. याशिवाय क्लबतर्फे शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात राबवले जाणारे उपक्रम हे कौतुकास्पद असून त्यामुळे आम्हा शिक्षकांना अधिक चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते, असे सांगून भविष्यात आणखी प्रेरणादायी कार्य करण्याची ग्वाही दिली.

## श्री क्षेत्र शंभू महादेव देवस्थानचे मठाधिपती श्री महंत भागवत गिरीजी महाराज अध्यक्षपदी विराजमान

**मंठा । प्रतिनिधी -** श्रीक्षेत्र शंभू महादेव येथील सद्गुरु श्री रामगिरीजी महाराज ट्रस्ट या ट्रस्ट वरती मठाधिपती गुरुवर्य परम श्रद्धेय श्री महंत भागवत गिरीजी महाराज हे अध्यक्षपदी तर आदरणीय श्री महंत बालकगिरीजी महाराज हे सचिव पदी विराजमान झाले. यानिमित्ताने सर्व भक्त परिवाराच्या सहकार्याने दिनांक ०५/०१/ २०२५ वार रविवार रोजी श्री क्षेत्र शंभू महादेव देवस्थान येथे श्री क्षेत्र नांगरतास ते श्री क्षेत्र शंभू महादेव देवस्थान भव्य शोभा यात्रा काढण्यात आली तसेच महारुद्र अभिषेक व दोन्हीही महाराजांचा भव्य सत्कार करण्यात आला.

या सोहळ्यासाठी प्रमुख उपस्थिती मंठा परतूर चे विद्यमान आमदार माननीय श्री बबनरावजी लोणीकर साहेब, मा.अमदार नारायण भाऊ कुचे साहेब, माजी आमदार ॲडव्होकेट विलास बापू खरात साहेब, माजी आमदार अरविंदराव चव्हाण साहेब

मा. श्री भाऊसाहेब काका गोरे मंठा परतूर राष्ट्रवादी अध्यक्ष त्याचप्रमाणे आजी-माजी जिल्हा परिषद सदस्य पंचायत समिती सदस्य सरपंच व हजारोंच्या संख्येने भाविक भक्त उपस्थित होते

या मंगलदिनाची सुरुवात भव्य दिव्य शोभायात्रेद्वारे करण्यात आली या शोभायात्रेमध्ये दोन्हीही महाराजांना भव्य रथामध्ये विराजमान करून त्यांच्या समवेत हजारोंच्या संख्येने भक्तगण आपापली वाहने घेऊन सहभागी झाले होते.

पांगरी गोसावी या गावांमध्ये श्री राहुल भैया लोणीकर साहेब श्री भाऊसाहेब गोरे साहेब व पांगरी गावकऱ्यांच्या वतीने दोन्हीही महाराजांचे पूजन व सत्कार करण्यात आला.

अध्यक्ष व सचिव पदावर विराजमान झाल्याबद्दल दोन्हीही महाराजांचा सर्व भक्त परिवाराच्या वतीने आमदार साहेबांनी पुष्पमाला अर्पण करून सत्कार केला.

यावेळी संपूर्ण परिसर हर हर महादेव या गर्जनेने दणाणून उठला. याप्रसंगी आदरणीय श्री महंत बालकगिरीजी महाराज सचिव यांनी सर्व भक्तांना शुभाशीर्वाद पर मार्गदर्शन केले त्यांनी सर्वांना जाती-जातीमधील मतभेद विसरून भक्त म्हणून सर्वांनी एक राहण्याचे आवाहन करून या शंभू महादेव तिर्थ क्षेत्राचा विकासासाठी सर्वांनी मदत करावी असे आवाहन केले

या सोहळ्यासाठी शंभू सावरगाव, काकडा,नेर, गोसावी पांगरी येथील हजारो भाविक त्तांनी सेवा दिली. या सोहळ्या साठी संपूर्ण महाराष्ट्रातून



हजारो च्या संख्येने जनसमुदाय उपस्थित होता १० हजार भाविक भक्तांची भोजन व्यवस्था श्री नामदेव भाऊ राठोड शंभू सावरगाव, सुभाष भाऊ सहाणे शंभू सावरगाव व प्रल्हाद भाऊ पिठोरे काकडा येथील भक्तांनी केली होती या सोहळ्या मधील जनसमुदाय च्या मुखात एकच होते हे देवस्थान आज पर्यंत वादग्रस्त होते शासनाच्या ताब्यात होते आता सद्गुरू श्री रामगिरीजी महाराज ट्रस्ट ही नवनिर्वाचित ट्रस्ट होऊन या वरती श्री महंत भागवतगिरीजी महाराज अध्यक्ष पदी व श्री महंत बालकगिरीजी महाराज सचिव पदी विराजमान झाले अता देवस्थानचा कायापालट झाल्याशिवाय राहणार नाही.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.